(6)

# Historicity

## International Research Journal

# Certificate of Publication

Impact Factor : 1.4152 (UIF) ISSN 2393-8900

*This is to certify that our Editorial, Advisory, and Review Board Accepted Research Paper of* गुजर विजय भगवान *Topic:-* महात्मा जोतिराव फुले यांचे सामाजिक कार्य *The Research paper is Original & Innovative it is Done Double Blind Peer Reviewed. Your Article is Published in The Month of January Year 2017.*

**Editor-in-Chief**

**Sanjay Gaikwad**

# "महात्मा जोतिराव फुले यांचे सामाजिक कार्य"

प्रा. गुजर विजय भगवान
इतिहास विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज.
संलग्न शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.



**प्रस्तावनाः–**

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ समाजचिंतक होते. त्यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाज, दलित महिला यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. सनातनी विचारावर टिकेचे आसूड ओढले. शिक्षण हे सर्वांगिण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे अशी त्यांची धारणा होती. व हे द्वार त्यांनी शुद्रांना व अतिशूद्र मानल्या जाणाऱ्या स्त्रियांना खुले करून दिले. दलित शोषित वर्गाला त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी ते आयुष्यभर लढले. ते मानवतावादाचे उपासक होते. एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रात बहुजन समाजाला जागृत करून त्यांना आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याची शिकवण महात्मा फुले यांनी दिली होती. महात्मा फुले म्हणजे बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी टाहो फोडणारे प्रथम पुरूष होते. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्वावर त्यांची नितांत निष्ठा होती. सामाजिक विशमतेविरूध्द त्यांनी आवाज उठविला तेंव्हा त्यांच्या या सामाजिक विचाराची व कार्याची समाजाला ओळख व्हावी, या हेतूने व शोधनिबंधातून सविस्तर माहिती दिलेली आहे.

## महात्मा फुले यांचे सामाजिक विचार व कार्य :–

जोतिबा फुले यांनी शिक्षण संपल्यानंतर सरकारी नोकरी न करता घरचा धंदा करण्यास सुरूवात केली. परंतु त्यांचे मन त्यात रमत नव्हते. लोकसेवा व लोककल्याण याविषयीचे विचार त्याच्या मनात घोळत होते. याच वेळी एक घटना घडली ती म्हणजे जोतिबा फुले एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या गेले. त्यावेळी निघालेल्या मिरवणूकीत सनातनी ब्राह्मणांनी जोतिबांना ओळखले व त्यांचा अपमान केला. जोतीबाचा हा झालेला अपमान मनात सलू लागला. त्या लग्नाच्या मिरवणूकीतून ते रागाने बाहेर पडले व घरी तडक निघून गेले. त्यांच्या मनात समाजातील विषमतेबद्दल चिड निर्माण झाली. सामाजिक न्यायासाठी संघर्ष केलाच पाहिजे असे म्हणून त्यांनी सामाजिक कार्य सुरू केले.[1] यामध्ये स्त्री उध्दाराचे कार्य, अस्पृशांच्या उध्दाराचे कार्य, सत्यशोधक समाजाची स्थापना व शिक्षण विषयीचे विचार यांचा समावेश होतो.

एकोणीसाव्या शतकातील महात्मा फुले हे एक श्रेष्ठ समाजक्रांतीकारक होते. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, शूद्रातिशुद्र, स्त्री–सुधारणा, शिक्षण इत्यादी महत्वपूर्ण विषयावर त्यांनी अतिशय मूलगामी स्वरुपाचे विचार मांडले आहेत.[2] शोषित, पिडीत, उपेक्षित लोकांच्या दुःखाच भान हेच त्यांना कळलेलं सत्यज्ञान आहे. कारण सत्य समजल्याशिवाय ज्ञान निर्माण होत नाही आणि ज्ञान प्राप्तीशिवाय सत्य विचाराची सत्य आचरणाची, सत्य इतरांना सांगण्याची ओढ निर्माण होत नाही या पातळीवर जाणे म्हणजेच सत्य विचाराला, सत्य वर्तनाच्या झाडाला आलेली फळे आहेत हेच महात्मा फुले आपल्या भाषणातून सांगत आहेत[3] मुठभर माणसांच्या पोटांची सोय लावणारा धर्मच असू शकत नाही. हे महात्मा फुले यांना जाणवलेल सत्य माणसाला जीवनात सुख हवे असेल तर सत्यवर्तन हाच त्या सुखाचा राजमार्ग आहे.[4]

## स्त्री उध्दाराचे कार्य –

भारतीय समाजाने स्त्रियांना सामाजिक समतेपासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते. जोतिबांना वाटत होते की, स्वाभिमान जागृत करण्यासाठी शिक्षण ही गरजेचे आहे. शिक्षणामुळे अज्ञान दूर होऊन समाजात सर्व सुधारणा होण्यास मदत होते. म्हणूनच स्त्रियांच्यात शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी स्त्रियांच्या उध्दारासाठी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन इ.बाबत महत्वाचे कार्य केले. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दरी' या सत्याचा प्रत्यय जोतिबांना आला होता. म्हणून स्त्रियांना शिक्षण देण्याचे ठरविले.[5]

पुण्यात इ.स. 1848 मध्ये मुलींच्यासाठी एक शाळा सुरु केली. तेथे अस्पृश्य समाजातील स्त्रियांना शिक्षण दिले जात होते. त्या शाळेत जोतिबा स्वतः शिक्षकाचे काम करीत असत. तर स्त्रीशिक्षिका म्हणून आपली पत्नी सावित्रीबाईंना तयार केले. त्यामुळे सनातनी लोकांनी या पती–पत्नीला खूपच त्रास दिला. तरीही जोतिबांनी न डगमगता आपले कार्य नेटाने चालू ठेवले होते. ही मुलींची शाळा बंद पडली तेंव्हा जोतिबांनी इ.स. 1851 मध्ये बुधवार पेठेत दुसरी मुलींची शाळा काढली. याच वर्षी रास्ता पेठेत तिसरी शाळा व इ.स.1852 मध्ये वेताळ पेठेत चौथी मुलींची शाळा सुरु केली. त्यांनी काढलेल्या या शाळेस सरकारचेही सहकार्य मिळाले.[6]

जोतिबांनी समाजातील विधवा स्त्रीवर होणारे अन्याय रोखण्यासाठी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. इ.स.1864 मध्ये पुण्यातील गोखले यांच्या बागेत एक विधवा पुनर्विवाह घडवून आणला. तेंव्हा काही विधवांचे पाऊल वाकडे पडून समाजात जगने अवघड होत असे. तेव्हा भ्रूणहत्या, आत्महत्या असे प्रकार घडत असत. यापासून विधवांची सुटका व्हावी म्हणून जोतिबांनी इ.स.1863 मध्ये विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी व आपले मूल तेथे ठेवण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह उघडण्यात आले. यातील काशीबाई नावाच्या विधवेचा मुलगा यशवंत हा जोतिबांनी दत्तक घेतला. तो ब्राम्हण जातीतील होता अशाप्रकारे स्त्रियांसाठी जोतिबांनी केलेले कार्य समाजक्रांती घडवून आणणारे होते.

**अस्पृशांच्या उध्दाराचे कार्य –**

इ.स.1852 मध्ये अस्पृश्यांच्यासाठी वेताळ पेठेत स्वखर्चाने एक शाळा काढली. इ.स.1853 मध्ये काही मित्रांच्या सहाय्याने 'महार, मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरीता मंडळी' या नावाची संस्था काढली. त्यांनी सुरु केलेल्या या कार्यास सर्व शिक्षणप्रेमींनी सहकार्य केले. अशाप्रकारे त्यांनी इ.स.1858 पर्यंत पुण्यात तीन शाळा सुरु केल्या उच्च वर्णियाकडून या अस्पृश्यांना वाईट वागणूक मिळत होती. या अस्पृश्यांना कोणत्याही क्षेत्रात कसलेही अधिकार नव्हते त्यांना उपेक्षितच जीवन जगावे लागत होते. म्हणूनच महात्मा फुले यांनी या समाजाला अंधकारातून बाहेर काढण्याकरीता अनेक ग्रंथ व काव्यावर आधारित पुस्तके लिहिली. तसेच 'गुलामगिरी' या ग्रंथातून उच्च वर्णियावर कठोर टिका केली आहे. तसेच अस्पृश्यांनी आपले अज्ञान घालवावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही असा ही संदेश दिला आहे.[7]

**सत्यशोधक समाज –**

महात्मा फुले यांनी आपले विचार समाजापर्यंत पोहचावेत यासाठी सतत पंधरा वर्षे जाहीर सभा, पत्रके आणि पुस्तिका याद्वारा व्यक्त केले होते. कनिष्ठ वर्गाना शिक्षणाचे महत्व पटवून ते त्यांनी आपल्या मुलांना द्यावे. असा ते उपदेश करीत राहिले होते. देवाच्या आणि धर्माच्या नावाखाली भटभिक्षुकांनी व शास्त्री पंडितांनी धार्मिक ग्रंथाच्याद्वारा त्यांच्या मानेभोवती मानसिक गुलामगिरीचे पाश गुंडाळले होते. त्यांच्यावर लादलेली गुलामगिरी व त्यांच्यात प्रस्तुत केलेल्या दुष्ट चालीरिती व धर्मभोळया वेडगळ समजुती झुगारुन स्वतःस मुक्त करावे असा त्यांनी सतत आक्रोश चालविला होता.

महात्मा फुले यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मनावर असे ठसविण्याचा प्रयत्न केला की, ब्राम्हणी शास्त्रांनी त्यांच्यावर लादलेली मानसिक गुलामगिरी ही काही ललाट लिखित नाही तसेच ती देवनिर्मित नाही. जन्मतःच ती गुलामगिरी त्याच्याबरोबर येते ही कल्पना अत्यंत चुकीची आहे. सर्वसामान्य वर्गामध्ये त्यांनी आत्मविश्वास आणि आत्मसम्मान या विषयीची जाणीव जागृती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी समता, बंधुता व स्वातंत्र्य हे विचार रुजविण्यासाठी सन 1873 मध्ये सत्यशोधक समाज स्थापन केला. हा समाज स्थापन करण्यामागचा त्यांचा हेतू सर्व जाती धर्माच्या लोकांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे व समाजजागृतीचे कार्य व्हावे हा होता. अशाप्रकारे कनिष्ठ वर्गाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणारी ती एक प्रकारची चळवळच महात्मा फुले यांनी सुरु केलेली होती.

सत्यशोधक समाजाची तत्वे पुढीलप्रमाणे होती.

सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आई–बाप आहे. त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास पुरोहित किंवा गुरु यांची आवश्कता नाही. ही दोन्ही तत्वे मान्य झाल्यास सत्यशोधक समाजाचे सभासद होता येत होते या समाजामार्फत दारु बंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तू वापरण्यास प्रोत्साहन देणे, ब्राम्हणाची धार्मिक क्षेत्रातील पुरोहितगिरी जुगारुन देणे, कुटूंबियातील लग्ने अल्पखर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भूते

आणि संबंध यांच्या भितीपासून लोकांना मुक्त करणे इत्यादी गोष्टी संबंधित चर्चा होत असे. अशाप्रकारे सत्यशोधक समाजाने जातीभेद, मूर्तीपूजा यांच्या विरुध्द मुख्य प्रचार सुरु केला होता.[8]

**शिक्षण विषयक विचार व कार्य –**

महात्मा यांचे शिक्षण विषयक विचार अत्यंत वेगळे होते. त्यांच्यामते बहुजन समाज, स्त्रिया, दलित यांच्या मुक्ती लढयाचे पहिले पाऊल शिक्षण होते. शिक्षण म्हणजे समाज क्रांतीची तयारी हा त्यांचा दृष्टीकोन होता. कष्टकऱ्यांना शिक्षण मिळाले तर ते माणूस म्हणून उभे राहतील. जग, समाज, समजण्यासाठी त्यांना साधने मिळतील. लढा देण्यासाठी हत्यार मिळेल अशी धारणा त्यांची होती. उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर जास्त जोर दिला. हे शिक्षण सर्व मुलांमुलींना मिळाले पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली. बहुजन समाजाला शिक्षण मिळाले तर शूद्र, अतिशूद्र स्त्रिया अन्यायाविरोधी लढयात संघटीत होतील असा महत्वपूर्ण विचार महात्मा फुले यांनी मांडला.

अस्पृश्यआणि स्त्री हे दोन्ही समाजाचे घटक आधुनिक ज्ञानापासून वंचित राहिले याचे प्रमुख कारण म्हणजे सगळा हिंदू समाज अंधश्रध्देत जखडला गेला होता. अस्पृश्य व स्त्रियां यांना विद्येचा अधिकार नाही असे उच्च वर्णिय वर्गाचे मत होते. स्त्री शिकली तर कुटूंब व्यवस्था मोडेल, ती कुमार्गाला लागेल इत्यादी अतार्किक कल्पनामुळे स्त्रीला शिक्षणाचा हक्क नाकारला होता. या उलट स्त्री शिकली तर घर शाळा बनेल कारण आईच मुलांची पहिली गुरु असे विचार महात्मा फुले यांनी मांडले आहेत. महात्मा फुले हे सामाजिक कृतिशील विचारांचे होते.[9]

**शेतकरी कामकरी यांचे शिक्षण –**

शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणात गोडी निर्माण व्हावी यासाठी कार्यात्मक शिक्षणावर महात्मा फुले यांनी भर दिला. शेतीस उपयोगी शिक्षण मिळाले तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही सुधारेल. यासाठी त्यांच्या अभ्यासक्रमात इतर सर्व साधारण विषयांबरोबरच शेतकी आणि आरोग्य यांच्या मुलभूत ज्ञानाचा अंर्तभाव केला पाहिजे. अभ्यासक्रमात मोडी, बाळबोध, लेखन – वाचन, हिशोब, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान तसेच निती आणि आरोग्य या संबंधीचे सोपे धडे अंर्तभूत करावे. विद्यार्थ्यांना शेतकीच्या पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यवहारीक शिक्षण देता यावे म्हणून, "आदर्श शेतीची छोटीशी योजना आखल्यास फायदेशीर ठरेल." अशी महात्मा फुले यांनी शिक्षणाबाबत भूमिका घेतली होती. शेतकरी व कामकरी यांनी आपली मुले शाळेत पाठविली नाहीत तर केवळ त्या कुटूंबाचे व समाजाचे नुकसान होईल. त्याचप्रमाणे देशाचेही नुकसान होईल हे विचार महात्मा फुले यांनी मांडले आहेत.

इ.स.1848 मध्ये पुणे येथे महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात सुरु केली. महात्मा फुले दाम्पत्याने शाळा काढल्या. इ.स.1848 ते 1852 या चार वर्षांच्या कालावधीत पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण परिसरात एकूण 18 शाळा काढल्या आणि त्या यशस्वीपणे चालविल्या. या शाळा चालविण्यासाठी त्यांनी अविश्रांतपणे परिश्रम केले. त्यांनी रात्र दिवस तहान भूक विसरून परोपकारी कृत्याचा पिच्छा न सोडता हा ज्ञानदानाचा यज्ञ अहोरात्र प्रज्वलित ठेवला. फुले दाम्पत्यांचे हे कार्य म्हणजे या दाम्पत्यांनी घडवून आणलेला एक चमत्कार होता. कारण त्या काळात अशा शाळा चालविणे या अशक्य कोटीतील गोष्टी होत्या.

महात्मा फुले दाम्पत्याने शाळा काढल्या, परंतु शाळांची जाळी विणीत ते बसले नाहीत. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणातून त्यांना समाज जागृत करावयाचा होता. सामाजिक रूढी, परंपरा, भोळया समजूती व अंधश्रध्दा त्यांना नाहिश्या करावयाच्या होत्या. महात्मा फुले यांनी जाती संस्था परंपरागत रूढी, सामाजिक, धार्मिक आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य केले त्यात शैक्षणिक मते स्पष्ट झालेली आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे ही मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय होते.[10]

**महात्मा फुले यांचे अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य :–**

समाजात धर्माच्या नावाखाली सुरू असलेल्या अपप्रकारांचा महात्मा फुले यांनी जाहिर निषेध केला होता. अनिष्ठ कल्पना मधील फोलपणा त्यांनी अनेक युक्तीवादासह पटवून दिला. तर कर्मकांड, मूर्तीपूजा, फलनिष्पत्ती, बुवाबाजी व अवतार कथा वगैरे वर फुले यांनी तार्किक व व्यवहारिक प्रहार केले होते. महात्मा फुले यांनी

सत्यशोधक समाजामार्फत अंधश्रध्दा निर्मूलनाबाबत कार्य हाती घेतले होते. समाजाच्या विविध स्तरातून त्यांच्या या कार्यालया चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये सरकारी अधिकारी, व्यापारी, डॉक्टर, कंत्राटदार, सुशिक्षित, व्यवसायिक यांच्यापासून ते शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य व्यापाऱ्यांपर्यंतच्या लोकांचा समावेश होता. अंधश्रध्दा निर्मलनाचे कार्य हाती घेतल्यानंतर त्यांचे अनेकांषी हितसंबंध दुखावले होते. परंतु त्याचा विचार न करता त्यांनी आपले कार्य तसेच पुढे चालू ठेवले होते. त्यांनी अंधश्रध्देमुळे लोकांची कशी फसवणूक होते हे पटवून दिले आहे.

महात्मा फुले यांनी ओळखले होते की, अंधश्रध्देचे खरे मुळ अज्ञानात आहे आणि अज्ञान दूर होताच अंधश्रध्दा दूर होईल. यासाठी अज्ञान दूर करण्याचे त्यांनी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. अंधश्रध्दामुळे शुद्रातिशुद्र वर्गाची ऐहिक पिछेहाट झाली होती. हा कार्यकारणभाव महात्मा फुले यांनी स्पष्टपणे मांडलेला दिसून येतो. दैन्यदारिद्रयाचा विसर पडण्यासाठी लोक भ्रामक समजुतींना व अंधश्रदांना जवळ करतात. अंधश्रध्दा बहुतांशी दुःखी, कष्टी मनाला खोटा दिलासा देते. त्या आधाराची गरज नाहिशी व्हायचे असेल तर ज्या दैन्यापोटी ती निर्माण होते तेच संपवावे लागेल. दारिद्रय, आर्थिक विषमता, शोषण आणि मागासलेपणा संपवण्याच्या कांतीकारक चळवळीशी अंधश्रध्दा निर्मुलनाची जुळणी झाली तरच अंधश्रध्दा नष्ट होवू शकेल. म.फुले यांनी अंधश्रध्दा निर्मुलनाचे हाती घेतलेले कार्य प्रत्यक्ष क्रियाशील झाले नाही, कारण त्यांच्या पश्चात स्थितीवादी प्रवाहच उत्तरोत्तर प्रबळ ठरलेला दिसतो. त्यामुळेच त्यांच्या या चळवळीचे यश हे अल्पजीवी ठरलेले दिसते[11]

**मूल्यमापन –**

महात्मा फुले हे नुसते बोलघेवडे नव्हते तर कर्ते सुधारक होते. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते ऋषी होते. त्यांचे व्यक्तिमत्व प्रत्यक्ष कृती करणारे विकसनशील असे होते. त्यांनी समाजातील बऱ्या वाईट प्रवत्तींचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक गोष्टींच्या मुळाशी जाऊन त्यावर चिंतनशीलपणे ते विचार करीत असत. म्हणूनच ते महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला वेगळी दिशा दाखविली. हे प्रबोधन करीत असताना त्यांना अत्यंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यासाठी अनेक हालअपेष्टा सहन केल्या. तरीही ते आपल्या ध्येयापासून कधीच विचलीत झाले नाहीत.

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ समाजचिंतक होते. त्यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाज, दलित महिला यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. सनातनी विचारावर टिकेचे आसूड ओढले, शिक्षण हे सर्वांगिण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे अशी त्यांची धारणा होती व हे द्वार त्यांनी शूद्रांना व अतिशूद्र मानल्या जाणाऱ्या स्त्रियांना खुले करुन दिले. दलित व शोषित वर्गाला त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी ते आयुष्यभर लढले ते मानवतावादाचे उपासक होते. म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा फुले यांचे स्थान अढळ आहे.

**संदर्भ**


1. किर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, 1968, पृ.19,20
2. कित्ता, पृ.25
3. आगलावे सरोज, जोतीराव फुले सामाजिक तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे 2003, पृ.15
4. कल्याणकर बा.ह., जोतीराव फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म, लोकराज्य, महात्मा फुले विशेषांक, 1991, पृ.74
5. कित्ता,पृ. 75
6. भिडे जी.एल.व पाटील एन.डी., पृ.73
7. ऑम्व्हेट गेल, जोतीबा फुले आणि स्त्री–मुक्तीचा विचार, लोकवाङ्मय गृह मुंबई नोव्हेंबर 1990, पृ.11
8. गोखले म.वि.,निवडक चरित्रे भाग–1, ज्योत्स्ना प्रकाशन पुणे–ऑगस्ट 2008, पृ.54
9. फडके य.दि.(संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, म.रा.सा.स.मंडळ 1991, पृ.32
10. फडके य.दि.(संपा.), उपरोक्त, पृ.566
11. फडके य.दि.(संपा.), उपरोक्त, पृ.579